महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

**क्र. पीआर-३ / यंत्रमाग /६१३४** **दिनांक : ०१/०३/२००८**

# वाणिज्य परिपत्रक क्र. ७७

**विषय :** यंत्रमाग ग्राहकाला ०१ एप्रिल २००७ पासुन लागू होणारे सवलतीचे दर.

**संदर्भ :** १) शासन निर्णय दिनांक २६.०२.२००८.
२) शासन निर्णय क्र. टॅरिफ-२००७/प्र.क्र.२७/ऊर्जा-३ दिनांक १७.१०.२००७
३) वाणिज्य परिपत्रक क्र. ६९ दिनांक १२.११.२००७.

---

वरील संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये उच्चदाब व लघुदाब यंत्रमागधारकांना शासनाने वीज बिलात सवलत देण्याचा निर्णय घेतला होता. सदर सवलत दि. ०१ एप्रिल २००७ पासुन पुढील कालावधीकरीता होती. सदर निर्णय वाणिज्य परिपत्रक क्र. ६९ दि. १२.११.२००७ नुसार अंमलबजावणी करीता सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आलेला होता. तथापि, वरील निर्णयामध्ये शासनाने बदल केलेला असून महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक २६. ०२. २००८ नुसार दिनांक १ एप्रिल २००७ पासुन पुढील कालावधीसाठी यंत्रमागधारकांना खालीलप्रमाणे सवलतीचे दर जाहिर केलेले आहेत.

१) दि. ०१ एप्रिल, २००७ ते ३१ डिसेंबर २००७ या कालावधीसाठी शासन निर्णय दि. २८ ऑगस्ट, २००६ च्या निर्णयामध्ये नमूद केलेल्या सवलतीचे दर आकारण्यात यावेत.

२) शासन निर्णय दि. १७ ऑक्टोबर, २००७ व वाणिज्य परिपत्र क्र. ६९ दि. १२.११.२००७ अन्वये निर्धारित करण्यात आलेल्या सवलतीच्या दरांमध्ये दि. १ जानेवारी २००८ पासून पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

अ) २७ अश्वशक्ती अथवा त्यापेक्षा कमी जोडभार असणा-या लघुदाब यंत्रमागग्राहकांना स्थिर आकारात १०० टक्के सवलत व वीज आकार, इंधर समायोजन आकार आणि अतिरिक्त वीज आकारात (ॲडीशनल सप्लाय चार्ज) ५० टक्के सवलत देण्यात यावी.

ब) २७ अश्वशक्ती अधिक जोडभार असणा-या लघुदाब यंत्रमाग ग्राहकांना स्थिर आकारात १०० टक्के सवलत व वीज आकार, इंधन समायोजन आकार आणि अतिरिक्त वीज आकारात (ॲडीशनल सप्लाय चार्ज) ४० टक्के सवलत देण्यात यावी.

क) उच्चदाब विद्युत पुरवठा घेणा-या यंत्रमागग्राहकांना स्थिर आकारासहित वीज आकार, इंधन समायोजन आकार आणि अतिरिक्त वीज आकार यामध्ये सरसकट ४० टक्के सवलत देण्यात यावी.

३) सध्या ज्या हातमाग व्यावसायीकांना प्रकाश, पंखा यासारख्या उपयोगासाठी वापरण्यात येणा-या वीजेवर व्यापारी दराने आकरणी होत आहे, अशा सर्व हातमाग व्यावसायीकांना यापुढे निवासी वीज दराने आकारणी करण्यात यावी. यामुळे संबंधीत वितरण परवानाधारकास कमी मिळणा-या महसुलाच्या फरकाच्या रक्कमेची भरपाई शासनातर्फे आवश्यक अर्थसहाय्य देवून करण्यात येईल.

४) अ.क्र. (२) व अ.क्र. (३) येथे नमूद केलेले सवलतीचे दर पुढील आदेश होईपर्यंत लागू राहतील.

वरील निर्णयानुसार वीज वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक बोज्याच्या भरपाईबाबतची अंमलबजावणी शासन मा. वीज नियामक आयोगाच्या आदेशाच्या अधीन राहुन करेल.

या बाबतीत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते कि, दि. ०१ एप्रिल २००७ पासुन दि. ३१ डिसेंबर २००७ पर्यंत यंत्रमागग्राहकांची बिले रु. १.६० प्रति युनिट याप्रमाणे व पुढील कालावधीकरीता शासनाच्या वरील निर्णयाप्रमाणे वीज बिले वितरीत करण्यात यावीत व या निर्णयापोटी ग्राहकांना परत करावयाची किंवा ग्राहकांकडून वसुल करावयाच्या रकमेचे समायोजन पुढील बिलात करावे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**<u>प्रत माहितीस सादर :-</u>**

**मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)**

वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने यंत्रमागग्राहकांच्या देयकाच्या संगणक प्रणालीमध्ये बदल करण्यात यावा तसेच वरील निर्णयास्वरुप ग्राहकांना परतावा रक्कम किंवा ग्राहकांकडून वसुल करावयाची रक्कम (जी असेल ती) त्याचे पुढील वीज बिलात समायोजन करण्यात यावे.

**<u>प्रत रवाना :-</u>**

१. मुख्य अभियंता, सं व सु, परिमंडळे, म.रा.वि.वि.कं.मर्यादित.
२. अधिक्षक अभियंता, सं व सु, मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.
३. कार्यकारी अभियंता, सं व सु, विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.
४. उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, सं व सु, उपविभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.